झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा / सप्रा ३/झोपुआ/ ६०९ /२०२२
दिनांक : १०/०६/२०२२.

# झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास( अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गाव मौजे भोसरी स.नं.५८, सेक्टर नं.१२, येथील खंडेवस्ती या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रावर क्षेत्रफळ १८९९९.९१ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) हे क्षेत्र पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे; आणि

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व त्रिमिती पध्दतीनुसार प्राप्त एकूण क्षेत्र १८९९९.९१ चौ.मी. घोषित नसलेमुळे सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त, झोनिपु विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांनी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेचा अहवाल कार्यालयीन जा.क्र. झोनिपु/०४/कावि/१६३/२०२० दि.१८/१२/२०२० रोजी सादर केलेला असलेमुळे तसेच सक्षम प्राधिकारी क्र.३ यांनी देखील दि.१४/०१/२०२१ रोजी स्थळपाहणी करुन त्यांचा स्वतंत्र अहवाल प्रकरणी सादर केलेला आहे. सदरचे संपूर्ण योजनाक्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनिय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.१८/०१/२०२२ रोजीची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी, २०२२ पान क्र. ६-७ मध्ये तसेच पुढारी व आज का आनंद या दैनिक वृत्तपत्रात दि.१९/०१/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.२८/०१/२०२२ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; तसेच सदरची नोटीशीची प्रत आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे, मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना व विकसक मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स यांना देखील देणेत आलेली आहे. आणि ज्याअर्थी, सदर दि.१८/०१/२०२२ रोजीच्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबतची पुर्वसूचना नोटीशीस कोणतीही आक्षेप / हरकत विहीत मुदतीमध्ये प्राप्त झालेले नाहीत; तथापि, पुणे महानगरप्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे मार्फत दि.१०/०२/२०२२ रोजीचे पत्र प्राप्त झालेले असून पत्रातील नमूद मुद्द्याबाबत योजनेचे विकसक यांना दि.०३/०३/२०२२ व दि.३१/०३/२०२२ रोजी खुलासा सादर करणेबाबत कळविणेंत आलेले होते. त्याअनुषंगाने विकसक यांनी पत्रातील नमूद दावा हा तत्कालिन

प्राधिकरणाचा भूसंपादन मोबदल्याच्या संदर्भातील आहे. खंडेवस्ती झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाशी याचा कोणताही संबंध नाही व न्यायालयाचा कोणत्याही प्रकारचा स्थगिती आदेश नाही. भविष्यात या संबंधी कोणतीही अडचण उद्भवल्यास याची कोणत्याही प्रकारची तोशिष झोपुप्रा, पुणे या कार्यालयास लागू देणार नाही, याची सदर प्रकल्पाचे विकसक म्हणून हमी देतो, असे या कार्यालयाकडे दि.०१/०४/२०२२ रोजीच्या प्राप्त पत्रान्वये कळविले आहे.

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल आणि अशा अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

**झोपडपट्टीचे नाव** :- स.नं.५८, सेक्टर नं.१२, खंडेवस्ती, भोसरी, पुणे
**महानगरपालिकेचे नाव** :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## अनुसूची

| गाव | स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) पूर्णत: | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| खंडेवस्ती, भोसरी, पुणे. | स.नं.५८, सेक्टर नं.१२. | पिंपरी चिंचवड नवविकास प्राधिकरण, निगडी (पुणे) महानगर प्रदेशविकास प्राधिकरण, पुणे (PMRDA) | १८९९९.९१ चौ.मी. | **पुर्वेस** - स.नं.५८ (पै)<br>**पश्चिमेस** - स.नं.५८ (पै)<br>**दक्षिणेस** - भोसरी एमआयडीसी<br>**उत्तरेस** - स.नं.५८ (पै) | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ** :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- १०/०६/२०२२.

(झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे)

7.6.22

**(राजेंद्र निंबाळकर)** (भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत- १. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण निगडी यांना - पुढील कार्यवाहीसाठी.
२. मा.आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका- यांना माहितीस्तव.
३. मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय- यांना माहितीस्तव.
४. व्यवस्थापक मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६.
५. मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स, ऑफिस नं.१-७, शौकम मंजिल, शितल हॉटेलजवळ, नेहरुनगर रोड, पिंपरी, पुणे -१८

(170)